# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.२०२५६२१३४६
Website:www.unipune.ac.in.

(पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
(Formerly University of Pune)

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind,Pune-411007
Phone: 2025621346
E-mail: coe@unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/415

दिनांक : 9 जून 2020

प्रति
मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.

**विषय :** कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर मार्च- एप्रिल 2020 मध्ये विविध अभ्यासक्रमांच्या अपूर्ण राहिलेल्या प्रात्यक्षिक, मौखिक, प्रोजेक्ट, इन सेमिस्टर व इतर महाविद्यालयीन स्तरावरील परीक्षांसंबंधी.
**संदर्भ :** विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ९३ व ९४, दि. १६ मे, २०२०.

कोरोना (कोव्हीड-१९) च्या प्रादुर्भावामुळे व त्यानुसार झालेल्या टाळेबंदीमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व परीक्षा दिनांक १७ मार्च, २०२० पासून स्थगित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे काही प्रात्यक्षिक/मौखिक/प्रोजेक्ट/तत्सम महाविद्यालय स्तरावरील परीक्षा पूर्ण होऊ शकल्या नाहीत. यासंदर्भात विद्यापीठाने परिपत्रक क्र. ९३ व ९४, दि. १६ मे, २०२० निर्गमित केले आहे.

याबाबत "अंतिम वर्षातील व अंतिम पूर्व वर्षातील ज्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक/मौखिक/प्रोजेक्ट/तत्सम महाविद्यालय स्तरावरील परीक्षा पूर्ण होऊ शकल्या नाहीत त्या पारंपरिक पद्धतीने अथवा प्रत्यक्ष हजर राहून घेण्यात येवू नयेत" असा निर्णय विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेला आहे.

सबब, मार्च २०२० च्या सत्रातील ज्या प्रात्यक्षिक/मौखिक/प्रोजेक्ट/तत्सम महाविद्यालय स्तरावरील परीक्षा पूर्ण होऊ शकल्या नाहीत त्यांचे मूल्यमापन हे महाविद्यालय स्तरावर या शैक्षणिक वर्षातील पूर्वीच केलेले अंतर्गत मूल्यमापन, जर्नल्स, टर्म वर्क, मौखिक परीक्षा अथवा अभ्यासक्रमात नमूद तत्सम तरतुदी यांच्या आधारावर करण्यात यावे. आवश्यकतेनुसार मा. प्राचार्य/संचालक यांनी त्यांच्याच महाविद्यालयातील शिक्षकांची अंतर्गत व बहि:स्थ पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करावी व त्यांच्या बीसीयुडी लॉगइन मधून सदर सर्व संबंधित विद्यार्थ्यांचे गुण विद्यापीठाच्या इंटरनल मार्क्स (intmark.unipune.ac.in) या लिंकचा उपयोग करून दिनांक १० जून, २०२० पर्यंत नोंदविण्यात यावेत. **सदर गुण नोंदविताना कोणत्याही प्रकारे रुपांतर (Conversion) करण्यात येऊ नये.**

मा. प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख यांनी सदर निर्णयाची कृपया नोंद घ्यावी व कार्यवाही करावी ही विनंती.

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ